




सी. एम. देसाई

शंकर-जयकिशनवर सुंदर पुस्तक

शंकर-जयकिशन यांच्या अविस्मरणीय गीतांचा एक सुरेख संग्रह प्रकाशित झालाय. त्याविषयी...

☐ विजय अकेला

प्रसिद्ध संगीतकारांची जोडी शंकर-जयकिशन यांनी शैलेंद्र आणि हसरत जयपुरींव्यतिरिक्त ४० इतर शायरांच्या शायऱ्याही स्वरबद्ध केल्या होत्या, हे तुम्हाला ठाऊक होतं का? तसंच त्यांनी लता, आशा, गीता दत्त, हेमंतकुमार, मुकेश, महंमद रफी, मन्ना डे, तलत महमूद, सुबीर सेन(ज्यांना त्यांनी स्वतः आणलं होतं.) महेंद्र कपूर आणि किशोरकुमार आणि इतर अशा सुमारे ५६ गायकांकडून स्वतःच्या संगीत दिग्दर्शनात गीतं गाऊन घेतलीत. हिंदी-उर्दू व्यतिरिक्त तामिळ, तेलगू, मराठी आणि इंग्रजी चित्रपटासाठीही या संगीतद्वयींनी संगीत दिलंय. हे सारं तुम्हाला त्यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकातून कळेल. त्यांनी स्वरबद्ध केलेली सर्वात जास्त गीतं लता मंगेशकरांनी गायलीत. लता मंगेशकरांनी त्यांची एकूण ४६९ गीतं गायलीत. या जोडीसाठी सर्वात जास्त गीतं म्हणजे ५१४ गीतं हसरत जयपुरी यांनी लिहिलीत. या जोडीने साईन केलेले १२ चित्रपट अद्यापि प्रदर्शित झालेले नाहीत. हे तुम्हाला माहीत आहे? १९४९मध्ये आलेला *बरसात* हा त्यांचा पहिला चित्रपट होता. आणि शेवटचा चित्रपट १९९१मधला *गोरी*. हे पुस्तक वाचल्यावर तुम्हाला कळेल की १६ वर्षांदरम्यान(१९५६ ते १९७२पर्यंत) शंकर-जयकिशन या जोडीने *चोरी चोरी*(१९५६), *अनाडी*(१९५८), *दिल अपना और प्रीत पराई*(१९६०), *प्रोफेसर*(१९६२), *सूरज*(१९६६), *ब्रह्मचारी*(१९६८), *पहचान*(१९६८), *मेरा नाम जोकर*(१९७०) आणि *बेईमान*(१९७२) या चित्रपटांसाठी नऊ ॲवॉर्ड मिळाले होते.

त्यांच्यावरील या पुस्तकावरून तुम्हाला हेही कळेल की, *चा चा चा रॉक, बिटल्स*सारख्या पाश्चात्य चालींबरोबर भैरवी, शिवरंजनी झिंझोटा, भूपाळी आणि दरबारी कन्नड व्यतिरिक्त इतर कित्येक ३२ भारतीय रागांवर या जोडींनी चाली बांधल्यात. या सर्व गोष्टी तुम्हाला मुद्देसूद या पुस्तकात पाहायला मिळतील.

शंकर यांचा जन्म इंदोर(मध्यप्रदेश)मध्ये झाला, तर जयकिशन वलसाड(गुजरात)मध्ये झाला. दोघांची भेट प्रथम निर्माता चंद्रवदन भट्ट यांच्या ऑफिसमध्ये झाली होती. तिथे दोघंही वर्तमानपत्रातील जाहिरात वाचून संगीतकार बनण्यासाठी गेले होते. शंकर यांना जेव्हा जयकिशन भेटले तेव्हा हार्मोनियम वाजवणाऱ्या या तरुणाला पृथ्वीराज कपूर यांच्या पृथ्वी थिएटरात ते घेऊन गेले, हार्मोनियम वाजवण्यासाठी. तिथे नाटकांसाठी शंकर स्वतः तबला वाजवायचे.

शंकरांचं पूर्ण नाव शंकरासह रघुवंशी होते. १५ ऑक्टोबर १९२२मध्ये त्यांचा जन्म झाला. जयकिशन यांचं पूर्ण नाव जयकिशन डाह्याभाई पंचाल होतं. ते शंकरापेक्षा ७ वर्षांनी लहान होते. त्यांचा जन्म १९२९मध्ये ४ नोव्हेंबरला झाला.

१२ सप्टेंबर १९७१मध्ये अवघ्या ४२व्या वर्षी जयकिशन हे जग सोडून गेले. *मैं सुंदर हूं*साठी ते संगीत तयार करत होते, तेव्हा त्यांच्या पोटात दुखू लागलं. तर २६ एप्रिल १९८७मध्ये हार्ट ॲटॅकने शंकर यांचा मृत्यू झाला.

या सर्व माहिती व्यतिरिक्त ३० वर्षांच्या कालावधीतील १२५ सुंदर गीतं या विषयावरही माहिती या पुस्तकात सामावली आहे. पुस्तकाची किंमत ३०० रुपये आहे. १२५ सुंदर गीतांच्या मागची पार्श्वभूमी कोणती होती? कोणत्या रागावर ही गीतं आधारलेली होती? चित्रपट कोणता? याची सर्व माहिती यात दिलेली आहे.

लेखक सी. एम. देसाईंची मुलाखत

□ हे पुस्तक लिहिण्याची प्रेरणा तुम्हाला कुठून मिळाली?

— लहानपणापासूनच मी शंकर-जयकिशनचा जबरदस्त चाहता होतो. मोठा झाल्यानंतर त्यांचे जिथे रेकॉर्डिंग व्हायचं तिथे जाऊ लागलो. त्यावेळी रेकॉर्डिंगच्या ठिकाणी जाणं आजच्या इतकं सोपं नव्हतं. पण दोघंही(शंकर-जयकिशन) संगीताबाबतची माझी अभिरुची पाहून रेकॉर्डिंगच्यावेळी लागले. तिथे मी लक्षपूर्वक त्यांची काम करण्याची पद्धत, शैली सर्व नोंदवत असे. दोघंही संगीताची पूजा करायचे हे माझ्या लक्षात आलं. ते फार मेहनत करायचे.

दुसरी गोष्ट म्हणजे एकदा नौशादजीं म्हणाले होते की, तेच आणि फक्त तेच भारतीय संगीताचे रक्षक आहेत आणि त्यांनीच सर्वात जास्त रागांवर आधारित गीतं दिलीत. हे मला पटलं नही. मी संशोधन सुरू केलं आणि माझा विश्वास खरा ठरला. मी या पुस्तकात शोधून शोधून शंकर-जयकिशन यांच्या रागदारीवर आधारित गीतांची संपूर्ण माहिती दिलीय. त्यामुळे तेच संगीतात सर्वश्रेष्ठ असल्याचं सिद्ध झालंय.

□ सध्या छापलेल्या गीतांच्या मोबदला म्हणून गीतकार आणि त्यांचे वारसदार गीतागणिक एक हजार रुपये मागत आहेत, तुम्ही ते देऊ शकाल.

— माझं हे पुस्तक माहिती देणारं पुस्तक आहे. पैसा गोळा करणारं नाही. जर पैसा कमावायचाच हेतू असतात तर या पुस्तकाची किंमत कमीत कमी १५००रुपये ठेवली असती. मी फक्त ३०० रुपये किंमत ठेवलीय. काही दिवसांपूर्वी मुंबई विश्वविद्यालयात मी भारतीय चित्रपट संगीतावर कित्येक लेक्चर्स दिली होती. या पुस्तकात याच लेक्चर्सचे काही भाग आहेत. त्यावेळी विद्यार्थ्यांनीही अशा पुस्तकासाठी आग्रह केला होता.

आज कित्येक टीव्ही कार्यक्रमांत गीत गाण्यासाठी कलाकार गीतांचे शब्द शोधतात तेव्हा त्यांना खरं गीत आणि शब्द मिळत नाहीत. मी लहान होतो तेव्हा मला कोणत्या गीतात काय सांगितलं जातं आणि कोणती गीतं कोणत्या रागावर आधारित आहेत याविषयी फार जिज्ञासा वाटत असे. मला वाटतं की या क्षेत्रात कुणीही माझ्यासाठी प्रेरणा बनलं नाही, पण कुणासाठी तरी मी प्रेरणा बनावं.

मी मनात आणलं असतं तर हे पुस्तक मी मोठ्या प्रकाशन संस्थेला देऊ शकलो असतो. पण मी आणि पुरोहितनी स्वतःची पदरमोड करून हे पुस्तक छापलं.


□ व्ही. एन. पुरोहितांबाबत काही सांगाल?

— श्रीमती व्ही. एन. पुरोहित संगीतप्रेमी आहेत. त्या माझ्याकडे संगीताबाबत माहिती मिळवण्यासाठी आल्या होत्या. कित्येक वर्षांपासून त्या मला सांगत होत्या की, तुमच्याकडे माहिती आहे तर संगीतावर एखादं पुस्तक लिहा. पैशाची व्यवस्था मी करते.

□ तुम्ही हे पुस्तक राज कपूर, आर. डी. बर्मन आणि लक्ष्मीकांत प्यारेलाल अर्पण केलंय. कारण?

— मी तिघांचाही चाहता आहे. आणि या तिघांनाही मी आवडत असे. राज कपूरच्या फिल्म मेकिंग रेंजसाठी तर मी वेडा होतो. कधीकधी मलाही एखादा चित्रपट बनवावा असं वाटायचं.

पंचमचं म्हणणं होतं की, जर तुम्ही मला पापा(एस.डी.बर्मन) यांच्या बंगाली गीतांचा खजिना आधी दिला असता, तर मी त्यांना तो ऐकवून आशीर्वाद घेतला असता. लक्ष्मीकांत



शंकर, दिलीपकुमार, शारदा, जयकिशन



शंकर-जयकिशन यांच्या संगीतात लताजींनी ४६९ गीतं गायलीत

म्हणायचे, प्रत्येक प्रकारचं संगीत ऐकणाऱ्यांची प्रतिभा संगीत देणाऱ्यापेक्षा जास्त असते.

□ पुस्तकाबाबत काही सांगाल?

— चित्रपटात आल्यानंतर गीतकारांची प्रॉपर्टी ही जनतेची अमानत होते. ज्या गीतकारांचे वारसदार गीतागणिक १००० रुपये मागत आहेत, ते योग्य नाही. यासाठीच आज शायरांची पुस्तकं बाजारात उपलब्ध नाहीत. आम्हाला जर समजलं की, एखादा गीतकार त्यांच्या गीताची फारशी पर्वा करत नाहीत तर आम्ही संगीत चाहते त्यांची आवश्यक काळजी घेतो. ✩